सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत देण्यात आलेल्या नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र (उत्पन्नाच्या प्रमाणपत्राची) वैधता पडताळणी समितीचे पुनर्गठन, प्रमाणपत्र पडताळणी कार्यपद्धती तसेच अपीलाच्या कालावधीबाबत.

महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांक: संकिर्ण-२०२५/ प्र.क्र.१९४/ मावक
३, कस्तुरी बिल्डींग, तळ मजला, १९५, टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०
दिनांक:- ३०/१०/२०२६

वाचा:-

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, शासन निर्णय कमांक : संकीर्ण २०२५/प्र.क्र.१९४/मावक, दिनांक ०४/१२/२०२५.

शासन शुध्दीपत्रक :-

संदर्भाधीन शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग तसेच शासन सेवेतील सरळ सेवा कोट्यातील पदभरतीसाठी आरक्षणाची टक्केवारी निश्चित करण्यात आलेल्या खुल्या प्रवर्गातील महिला, आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उमेदवार, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गामध्ये आरक्षणाचा लाभ घेणारे मराठा समाजातील उमेदवार इत्यादींना सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत देण्यात आलेल्या नॉन-क्रिमीलेअर (Non- Creamy Layer Certificate) प्रमाणपत्राची (उत्पन्नाच्या प्रमाणपत्राची) वैधता पडताळणीची सुधारित कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ मधील "अ) राज्य लोकसेवा आयोग तसेच केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत राज्य शासन तसेच केंद्र शासनाच्या सेवेमध्ये सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या कर्मचारी/ अधिकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्था/ अनुदानित संस्था/महामंडळे/बोर्ड इतर स्वायत्त संस्था आणि ज्यांना राज्य/ केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य मिळते अशा सर्व शासकीय, निमशासकीय संस्था यामधील भरती प्रक्रियेद्वारे सेवेत रुजू होणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यांना सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राची वैधता तपासून वैधता प्रमाणपत्र देणे."

या ऐवजी

"अ) राज्य लोकसेवा आयोग तसेच केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत राज्य शासन तसेच केंद्र शासनाच्या सेवेमध्ये सरळसेवेने नियुक्त होणाऱ्या कर्मचारी/ अधिकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्था/ अनुदानित संस्था/महामंडळे/बोर्ड इतर स्वायत्त संस्था आणि ज्यांना राज्य/ केंद्र शासनाकडून अर्थसहाय्य

मिळते अशा सर्व शासकीय, निमशासकीय संस्था यामधील भरती प्रक्रियेद्वारे सेवेत रुजू होणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी यापैकी ज्या कर्मचारी/अधिकारी विरुध्द नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या (उत्पन्नाच्या प्रमाणपत्राच्या) अनुषंगाने आक्षेप/तक्रारी दाखल करण्यात आले असेल अशाच अधिकारी/ कर्मचाऱ्याच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राची वैधता तपासून वैधता प्रमाणपत्र देणे."

असे वाचावे.

सदर शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६१०३०१४५१४५९५३४ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीत साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने,

Digitally signed by SACHIN SHRIPATI KHANDEKAR
Date: 2026.10.30 14:53:05 +05'30'

(स.श्री.खांडेकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा. मुख्यमंत्री महोदयांचे अ.मु.स/प्र.स/सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री महोदयांचे सचिव / खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री व राज्यमंत्री (सर्व), मंत्रालय, मुंबई
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधान भवन, मुंबई
६) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, विधान भवन, मुंबई
७) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन प्रशासकीय विभाग (सर्व) यांना प्रत अग्रेषित करुन विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयातील तरतुदी त्यांच्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास त्वरित आणाव्यात.
८) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग (सेवा), मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) प्रधान सचिव, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
११) सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
१२) सर्व आयुक्त, महानगरपालिका
१३) सर्व जिल्हाधिकारी

१४) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)
१५) आयुक्त समाजकल्याण, पुणे
१६) संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे
१७) सर्व निवासी उप जिल्हाधिकारी
१८) सर्व विभागीय/ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी
१९) सर्व प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण
२०) सर्व सहाय्यक आयुक्त समाजकल्याण
२१) सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी
२२) सर्व सहसचिव/उप सचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
२३) निवडस्ती (मावक)